गोपनीय

करण्यात आलेल्या कामाचे तपासणी बाबत.

क्रमांक : मुवसं / काआना / रेंस / 258 / 2012.13.

नागपूर, दिनांक : 07 / 06 / 2012

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),

नागपूर.

संदर्भ :– या कार्यालयाचे पत्र कमांक काआवि / ना / रेंस / 229 / 12–13 दिनांक 31 / 05 / 2012.

संदर्भीय पत्राचे अनुषंगाने भंडारा वनविभागात वर्ष 2011–12 मध्ये मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केलेल्या कामाच्या क्षेत्रीय कामांची तपासणी निम्न स्वाक्षरीकर्ते यांनी दिनांक 04 / 06 / 2012 व 05 / 06 / 2012 रोजी उपवनसंरक्षक, भंडारा, संबंधीत सहायक वनसंरक्षक, वनपरीक्षेत्र अधिकारी, पवनी, लेंडेझरी, जामकांदी व त्यांचे अधिनस्त क्षेत्रीय कर्मचारी यांचे समवेत करण्यात आली असून, भंडारा वनविभागातील पवनी, लेंडेझरी व जामकांद्री वनपरीक्षेत्रात मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे सीबीओ व नैसर्गिक पुर्नउत्पत्तीची कामे करण्यात आल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर कामाची तपासणी वरीष्ठ पातळीवर झाल्याचे सुध्दा दिसून येत नाही. क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी हे कार्य आयोजनेतील सीबीओ व नैसर्गिक पुर्नउत्पत्तीच्या कामाची अंमलबजावणी करण्यास अत्यंत उदासीन असून सदर कामे करताना गंभीर दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येते. वर्ष 2011–12 मध्ये मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे सदर कामे करण्यात आले नसून त्यामध्ये सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्रात नमुद केल्याप्रमाणे गंभीर स्वरुपाच्या अनियमीतता आढळून आल्या आहेत. सदर कामाचे तपासणीबाबतचा कुपनिहाय अहवाल पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी यासोबत जोडण्यात येत आहे.

2.00 सदर तीन्ही वनपरीक्षेत्रात वर्ष 2011–12 मध्ये मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे कामे न करता तसेच मोक्यावर प्रत्यक्षात कामे न करता रक्कम खर्च करण्यात आली असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे सदर कामाची मोका तपासणी तात्काळ आपलेमार्फत होणे आवश्यक असून सदर अनियमीततेस जबाबदार असलेले अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चीत होवून त्यांचेवर नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक आहे. याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही आपले स्तरावर तात्काळ करण्यात यावी, ही विनंती. तसेच यापुढे भंडारा वनविभागात सर्व कार्यवृत्तात मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे कामे करण्याबाबत आपले स्तरावर आवश्यक सूचना उपवनसंरक्षक, भंडारा यांना देण्यात यावी, ही विनंती.

सहपत्र : वरीलप्रमाणे

मुख्य वनसंरक्षक,

कार्य आयोजना, नागपूर.

**प्रपत्र**

| अ.क्र. | वनपरीक्षेत्र | कामाचा प्रकार | वर्कींग सर्कल | फेलींग सिरीज | कक्ष क्रमांक | कूप क्रमांक | एकूण क्षेत्र (हेक्टर) | कामाचे क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पवनी | NR | IWC | भुयार | 319 RF | II | 101.107 | 37.00 | सदर कुपात नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामे वर्ष 2011–12 ऐवजी वर्ष 2010–12 मध्ये करणे<br>आवश्यक होते. परंतू या कामाकरीता विचलन प्रस्ताव तयार न करता सदर कामे वर्ष 2011–12<br>मध्ये प्रस्तावित करण्यात आले होते. सदर कुपात बी1 प्रकारचे 64.29 हेक्टर क्षेत्र उपचार<br>नकाशावर दाखविण्यात आले असून सदर कुपाचे ग्रीड क्रमांक 1, 2, 7, 9, 12, 14, 17, 18, 19,<br>20 मध्ये पाहणी केली असता, प्रत्यक्षात सदर क्षेत्रातील बरेचसे वनक्षेत्र दाट झाडो–याचे<br>असल्याने डी प्रकारच्या क्षेत्रामध्ये मोडत असून उपचार नकाशे मोक्यावरील परीस्थितीनुसार<br>तयार करण्यात आले नाहीत. सदर कुपात नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे प्रमाण नगन्य असल्याने सदर<br>कामे मोक्यावर करण्यात आल्याचे दिसून आले नाही. हीच कामे क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी<br>मोक्यावर दाखवू शकले नाहीत. परंतू सदर कुपाकरीता बियापासून निघालेले नैसर्गिक<br>पुर्नउत्पत्तीचे रखरखाव व संगोपनाकरीता एकूण 64.00 हेक्टरकरीता रू. 80256/– चे<br>अंदाजपत्रक मंजूर करून 37.00 हेक्टर क्षेत्रावर दिनांक 09/01/2012 ते 25/01/2012 पर्यंत<br>बियापासून आलेले 60 सेमी पेक्षा जास्त उंची असलेले नैसर्गिक रोपावरील वेली काढण्याचे कामे<br>करण्यात आल्याची मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आली आहे. परंतू मोक्यावर बियापासून<br>निघालेले नैसर्गिक झाडांचे प्रमाण नगन्य असल्याने मोक्यावर सदर कामे झाले असल्याचे दिसून<br>आले नाही. सदर कुपात काही ठिकाणी अती अल्प प्रमाणात असलेले जुने थुटावर एक फुटवे<br>ठेवून उर्वरीत फुटवे काढून टाकल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद आहे. परंतू अशा प्रकारच्या<br>कामांची ग्रीडनिहाय व प्रजातीनिहाय नोंद मोजमाप पुस्तिकेवर करण्यात आली नाही. एकंदरीत<br>क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी सदर कुपात नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामे मंजूर कार्य<br>आयोजनेप्रमाणे केले नसल्याचे दिसून येत असून वरीष्ठ पातळीवर सुध्दा त्याची तपासणी झाली<br>नाही. सदर कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे मोक्यावर झाले नसताना सुध्दा रक्कम खर्च<br>करण्यात आले आहे. त्याची तपासणी होवून पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कुपात झालेले नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामाची संपुर्ण तपासणी मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, नागपूर यांना मोक्यावर भेट देवून त्याची तपासणी होवून पुढील आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक आहे. |
| 2 | पवनी | NR | IWC | माडवगोटा | 313 RF | II | 135.191 | 70.68 | सदर कुपाचे विचलन प्रस्ताव मंजूर करून न घेता वर्ष 2011–12 मध्ये सदर नैसर्गिक पुर्नउत्पत्तीची कामे करण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहेत. सदर कुपात बी1 प्रकारचे 121.28 हेक्टर क्षेत्र उपचार नकाशावर दाखविण्यात आले असून सदर कुपाचे ग्रीड क्रमांक 1, 2, 6, 7, 12, 86, 87, 92, 93, 94 व 95 मध्ये पाहणी केली असता, प्रत्यक्षात सदर क्षेत्राची घनता 0.5 पेक्षा जास्त असून बरेचसे वनक्षेत्र दाट झाडो–याचे असल्याने सदर वनक्षेत्र बी–1 प्रकारच्या क्षेत्रात मोडत नसून सी किंवा डी प्रकारच्या क्षेत्रामध्ये मोडते. त्यामुळे उपचार नकाशे मोक्यावरील परीस्थितीनुसार तयार करण्यात आले नाहीत. सदर कुपात नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे प्रमाण नगन्य असल्याने सदर कामे मोक्यावर करण्यात आल्याचे दिसून आले नसून हीच कामे क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी मोक्यावर दाखवू शकले नाहीत. परंतू सदर कुपाकरीता बियापासून निघालेले नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे रखरखाव व संगोपनाकरीता एकूण 121.00 हेक्टरकरीता रू. 151734/– चे अंदाजपत्रक मंजूर करून एकूण 70.68 हेक्टर क्षेत्रावर दिनांक 19/01/2012 ते 29/01/2012 पर्यंत बियापासून आलेले 60 सेमी पेक्षा जास्त उंची असलेले नैसर्गिक रोपावरील वेली काढण्याचे कामे करण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आली असून सदर कामावर रू.88632/– खर्च करण्यात आले आहे. परंतू मोक्यावर बियापासून निघालेले नैसर्गिक झाडांचे प्रमाण नगन्य असल्याने मोक्यावर सदर कामे झाले असल्याचे दिसून आले नाही. फक्त काही ठिकाणी अती अल्प प्रमाणात असलेले जुने थुटावर एक फुटवे ठेवून उर्वरीत फुटवे काढून टाकल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद आहे. परंतू अशा प्रकारचे कामांचा ग्रीडनिहाय व प्रजातीनिहाय नोंद मोजमाप पुस्तिकेवर करण्यात आली नाही. एकंदरीत क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी मोक्यावर नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केले नसल्याचे दिसून येत असून वरीष्ठ पातळीवर सुध्दा त्याची तपासणी झाली नाही. सदर कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे मोक्यावर झाले नसताना सुध्दा [illegible] |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | त्याची तपासणी होवून पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कुपात मोजमाप पुस्तिकेवर नोंद केलेल्या नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामाची संपुर्ण तपासणी मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, नागपूर यांना मोक्यावर भेट देवून त्याची तपासणी होवून पुढील आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक आहे. |
| 3 | पवनी | NR | IWC | कन्हाळगाव | 318 RF | II | 73.652 | 22.00 | सदर कुपाचे विचलन प्रस्ताव मंजूर करुन न घेता वर्ष 2011-12 मध्ये सदर नैसर्गिक पुर्नउत्पत्तीची कामे करण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहेत. सदर कुपात बी1 प्रकारचे 39.00 हेक्टर क्षेत्र उपचार नकाशावर दाखविण्यात आले असून सदर कुपाचे ग्रीड कमांक 2, 6, 9, 15, 16, 53, 74 व 75 मध्ये पाहणी केली असता, प्रत्यक्षात सदर कुपाचे बरेचशे वनक्षेत्र दाट झाडो-याचे असल्याने बी-1 प्रकारच्या क्षेत्रात मोडत नाही. त्यामुळे उपचार नकाशे मोक्यावरील परीस्थितीनुसार तयार करण्यात आले नाहीत. सदर कुपात नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे प्रमाण अत्यंत अल्प प्रमाणात असल्याने सदर कामे मोक्यावर करण्यात आल्याचे दिसून आले नाही. तसेच हीच कामे क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी मोक्यावर दाखवू शकले नाहीत, परंतू सदर कुपाकरीता बियापासून निघालेले नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे रखरखाव व संगोपनाकरीता एकूण 39.00 हेक्टरकरीता रू.48906/- चे अंदाजपत्रक मंजूर करुन 22.00 हेक्टर क्षेत्रावर दिनांक 08/01/2012 ते 20/01/2012 पर्यंत बियापासून आलेले 60 सेमी पेक्षा जास्त उंची असलेले नैसर्गिक रोपावरील वेली काढण्याचे कामे करण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आले असून सदर कामावर रू. 27588/- खर्च करण्यात आले आहे. परंतू मोक्यावर बियापासून निघालेले नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे प्रमाण नगन्य असल्याने मोक्यावर सदर कामे झाले असल्याचे दिसून आले नाही. फक्त काही ठिकाणी अती अल्प प्रमाणात असलेले जुने थुटावर एक फुटवे ठेवून उर्वरीत फुटवे काढून टाकल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद आहे. परंतू अशा प्रकारचे कामांची ग्रीडनिहाय व प्रजातीनिहाय नोंद मोजमाप पुस्तिकेवर करण्यात आली नाही. मोक्यावर सुध्दा अशा प्रकारचे फुटवे साफ केले असल्याचे स्पष्टपणे दिसून आले नाही. एकंदरीत क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी मोक्यावर नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केले नसल्याचे दिसून येत असून वरीष्ठ पातळीवर सुध्दा त्याची तपासणी झाली नाही. सदर कामे |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे मोक्यावर झाले नसताना सुध्द। रक्कम खर्च करण्यात आले आहे. त्याची तपासणी होवून पुढील कार्यवाही होणे आवश्यक :ाहे. त्यामुळे सदर कुपात मोजमाप पुस्तिकेवर नोंद केलेल्या नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामाची संपुर्ण तपासणी मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, नागपूर यांना मोक्यावर भेट देवून त्याची तपासणी होवून पुढील आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक आहे. |
| 4 | पवनी | NR | IWC | कोरंभी | 304 RF | II | 125.248 | 33.00 | सदर कुपात वर्ष 2010–11 मध्ये नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामे प्रस्तावित करणे आवश्यक असताना कोणत्याही प्रकारचे विचलन प्रस्ताव मंजूर करून न घेता वर्ष 2011–12 मध्ये नैसर्गिक पुर्नउत्पत्तीची कामे करण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहेत. स दर कुपात बी1 प्रकारचे 58. 765 हेक्टर क्षेत्र उपचार नकाशावर दाखविण्यात आले असून सद  कुपाचे ग्रीड कमांक 2, 4, 38, 41, 54, 56, 57, 65 व 66 मध्ये पाहणी केली असता, प्रत्यक्षात सदर कुपाचे बरेचशे वनक्षेत्र दाट झाडो–याचे असल्याने बी–1 प्रकारच्या क्षेत्रात मोडत नसून सदर क्षेत्र सी किंवा डी प्रकारच्या क्षेत्रामध्ये मोडते. त्यामुळे उपचार नकाशे मोक्यावरील परीस्थितीनुसार तयार करण्यात आले नाहीत. सदर कुपात बियापासून निघालेले नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे स ोपन व रखरखाव ची काने करण्यात आले नाही. सदर कुपात बियापासून निघालेले नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे प्रमाण अत्यंत अल्प प्रमाणात असल्याने सदर कामे सदर कुपात प्रस्तावित करणे :आवश्यक नव्हते. अशा प्रकारची कोणतीही कामे क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी मोक्यावर दाखवू शकले नाहीत. परंतू सदर कुपाकरीता बियापासून निघालेले नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे रखरखाव व संगोपनाकरीता एकूण 55. 00 हेक्टरकरीता रू.68970/– चे अंदाजपत्रक मंजूर करून एकूण 33.00 हेक्टर क्षेत्रावर दिनांक 16/01/2012 ते 25/01/2012 पर्यंत बियापासून आलेले 60 सेमी पेक्षा जास्त उंची असलेले नैसर्गिक रोपावरील वेली काढण्याचे कामे करण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आले असून सदर कामावर रू. 41382/– खर्च करण्यात आले आहे. परंतू मोक्यावर बियापासून निघालेले नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे प्रमाण नगन्य असल्याने मोक्यावर सदर कामे झाले असल्याचे दिसून आले नाही. फक्त काही ठिकाणी अती अल्प प्रमाणात असलेले जुने थुटावर एक फुटवे ठेवून उर्वरीत फुटवे काढून टाकल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद आहे. परंतू अशा प्रकारचे |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | कामांचा ग्रीडनिहाय व प्रजातीनिहाय नोंद मोजमाप पुस्तिकेवर करण्यात आली नाही. मोक्यावर सुध्दा अशा प्रकारचे फुटवे साफ केले असल्याचे स्पष्टपणे दिसून आले नाही. एकंदरीत क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी मोक्यावर नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केले नसल्याचे दिसून येत असून वरीष्ठ पातळीवर सुध्दा त्याची तपासणी झाली नाही. सदर कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे मोक्यावर झाले नसताना सुध्दा रक्कम खर्च करण्यात आले आहे. त्याची तपासणी होवून पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कुपात मोजमाप पुस्तिकेवर नोंद केलेल्या नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामाची संपुर्ण तपासणी मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, नागपूर यांना मोक्यावर भेट देवून त्याची तपासणी होवून पुढील आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक आहे. |
| 5 | पवनी | CBO | SCI | सिंगोरी हनेशा | 222 PF | II | 37.205 | 19.93 | सदर कुपात वर्ष 2010–11 मध्ये सीबीओ ची कामे प्रस्तावित करणे आवश्यक असताना कोणत्याही प्रकारचे विचलन प्रस्ताव मंजूर करून न घेता वर्ष 2011–12 मध्ये सीबीओ ची कामे करण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहेत.सदर कुपात सीबीओ चे कामाकरीता निष्कासनासाठी झाडे शिल्लक नसल्याने ही कामे करण्यात आली नाही. मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे सीबीओ अंतर्गत मुख्य कुपात शिल्लक झाडांचे निष्कासन पुढील वर्षी करणे आवश्यक असून अशा प्रकारची कामे सदर कुपात करण्यात आली नाहीत. परंतू सदर कुपाकरीता सीबीओ काम करणे, अनावश्यक शेंडामोड व लहान झाडे तोडणे, बेला कटाई, थुटावरील 1–2 जोमदार फुटवे ठेवून इतर फुटवे छाटणी व थुटाची साफसफाई/ड्रेसिंग करणे व नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामे करण्याकरीता एकूण 30.00 हेक्टरकरीता रू. 37440/– चे अंदाजपत्रक मंजूर करून 19.93 हेक्टर क्षेत्रावर दिनांक 09/01/2012 ते 19/01/2012 पर्यंत सदर कामे करण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आली असून सदर कामावर रू.24992/– खर्च करण्यात आले आहे. परंतू सदर कुपाचे ग्रीड कमांक 1, 2, 3, 4 ची मोका तपासणी केली असता, सदर कुपात निष्कासनाकरीता एकही झाडे शिल्लक नसल्याने सीबीओची कामे करण्यात आली नाहीत. परंतू अशा प्रकारच्या काम केले असल्याची नोंद मोजमाप पुस्तिकेवर करण्यात आली आहे. फक्त काही ठिकाणी अती अल्प प्रमाणात असलेले जुने थुटावर एक फुटवे ठेवून उर्वरीत फुटवे काढून |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

२५



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | टाकल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद आहे. परंतू अशा प्रकारचे कामांचा ग्रीडनिहाय व प्रजातीनिहाय नोंद मोजमाप पुस्तिकेवर करण्यात आली नाही. मोक्यावर सुध्दा अशा प्रकारचे फुटवे साफ केले असल्याचे स्पष्टपणे दिसून येत नाही. एकंदरीत क्षेत्रीय अधिकारी /कर्मचारी यांनी मोक्यावर सीबीओ कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केले नसल्याचे दिसून येत असून वरीष्ठ पातळीवर सुध्दा त्याची तपासणी झाली नाही. सदर कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे मोक्यावर झाले नसताना सुध्दा रक्कम खर्च करण्यात आले आहे. त्याची तपासणी होवून पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कुपात मोजमाप पुस्तिकेवर नोंद केलेल्या सीबीओ कामाची संपुर्ण तपासणी मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, नागपूर यांना मोक्यावर भेट देवून त्याची तपासणी होवून पुढील आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक आहे. |
| 6 | लेंडेझरी | CBO | SCI | लेंडेझरी | 52 RF | II | 93.077 | 72.127 | सदर कुपात वर्ष 2010–11 मध्ये सीबीओ ची कामे प्रस्तावित करणे आवश्यक असताना कोणत्याही प्रकारचे विचलन प्रस्ताव मंजूर करून न घेता वर्ष 2011–12 मध्ये सीबीओ ची कामे करण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहेत. सदर कुपात सीबीओ चे कामाकरीता निष्कासनासाठी झाडे शिल्लक नसल्याने ही कामे करण्यात आले नाही. मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे सीबीओ अंतर्गत मुख्य कुपात शिल्लक झाडांचे निष्कासन पुढील वर्षी करणे आवश्यक असून अशा प्रकारची कामे सदर कुपात करण्यात आली नाहीत. परंतू सदर कुपाकरीता सीबीओ काम करणे, अनावश्यक शेंडामोड व लहान झाडे तोडणे, बेला कटाई, थुटावरील 1–2 जोमदार फुटवे ठेवून इतर फुटवे छाटणी व थुटाची साफसफाई/ड्रेसिंग करणे व नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामे करण्याकरीता एकूण 72.127 हेक्टरकरीता रु.60103/– चे अंदाजपत्रक मंजूर करून एकूण 72.127 हेक्टर क्षेत्रावर दिनांक 10/01/2012 ते 25/01/2012 पर्यंत सदर कामे करण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आली असून सदर कामावर रु. 60103/– खर्च करण्यात आले आहे. परंतू सदर कुपाची मोका तपासणी केली असता, सदर कुपात ग्रीड व बेसलाईन मोक्यावर टाकण्यात आले नाही. सदर कुपात निष्कासनाकरीता एकही झाडे शिल्लक नसताना सुध्दा सीबीओची कामे करण्यात आली असल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आली आहे. सदर मोजमाप [illegible] |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | 127 हेक्टर क्षेत्रावर कटाई केलेल्या 2289 थुटावर आलेल्या फुटव्यांपैकी एक चांगला फुटवा ठेवून उर्वरीत फुटवे कापण्यात आले असल्याची नोंद केली आहे.परंतू सदर कुपात निष्कासनाकरीता एकूण 3242 झाडांपैकी 2465 झाडे गराडीचे असून त्यावर भरपूर प्रमाणात फुटवे दिसून आले. तसेच मोजमाप पुस्तिकेवर नोंद असल्याप्रमाणे निष्कासीत केलेले थुटावर आलेले फुटव्यांची साफसफाई करण्यात आल्याचे दिसून आले नाही. मोजमाप पुस्तिकेवर नोंद असल्याप्रमाणे कटाई केलेल्या झाडाच्या थुटावर एक चांगला फुटवा ठेवून उर्वरीत फुटवे कापण्यात आले, अशा प्रकारची कामे मोक्यावर स्पष्टपणे दिसून येत नाही. तसेच क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी अशा प्रकारची कामे मोक्यावर दाखवू शकले नाहीत. अशा प्रकारचे कामांचा ग्रीडनिहाय व प्रजातीनिहाय नोंद सुध्दा मोजमाप पुस्तिकेवर करण्यात आली नाही. एकंदरीत क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी मोक्यावर सीबीओ कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केले नसल्याचे दिसून येत असून वरीष्ठ पातळीवर सुध्दा त्याची तपासणी झाली नाही. सदर कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे मोक्यावर झाले नसताना सुध्दा रक्कम खर्च करण्यात आले आहे. त्याची तपासणी होवून पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कुपात मोजमाप पुस्तिकेवर नोंद केलेल्या सीबीओ कामाची संपुर्ण तपासणी मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, नागपूर यांना मोक्यावर भेट देवून त्याची तपासणी होवून पुढील आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक आहे. |
| 7 | जानकांद्री | CBO | IWC | सुसुरडोह | 41 RF | II | 118.485 | 45.750 | सदर कुपात वर्ष 2010–11 मध्ये सीबीओ ची कामे प्रस्तावित करणे आवश्यक असताना कोणत्याही प्रकारचे विचलन प्रस्ताव मंजूर करून न घेता वर्ष 2011–12 मध्ये सीबीओ ची कामे करण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहेत.सदर कुपात सीबीओ चे कामाकरीता निष्कासनासाठी झाडे शिल्लक नसल्याने ही कामे करण्यात आली नाही. मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे सीबीओ अंतर्गत मुख्य कुपात शिल्लक झाडांचे निष्कासन पुढील वर्षी करणे आवश्यक असून अशा प्रकारची कामे सदर कुपात करण्यात आली नाहीत. परंतू सदर कुपाकरीता सीबीओ काम करणे, अनावश्यक शेंडामोड व लहान झाडे तोडणे, बेला कटाई, थुटावरील 1–2 जोमदार फुटवे ठेवून इतर फुटवे छाटणी व थुटाची साफसफाई/ड्रेसिंग करणे व नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामे |

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | करण्याकरीता एकूण 45.750 हेक्टरकरीता रू.38190/– चे अंदाजपत्रक मंजूर करून सदर क्षेत्रावर दिनांक 01/01/2012 ते 14/01/2012 पर्यंत सदर कामे करण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आले असून सदर कामावर रू. 38190/– खर्च करण्यात आले आहे. परंतू सदर कुपाची मोका तपासणी केली असता, सदर कुपात ग्रीड व बेसलाईन मोक्यावर टाकण्यात आले नाही. सदर कुपात सीबीओ साठी आवश्यक असलेले झाडे नसताना सुध्दा अशा प्रकारची कामे केली असल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आली आहे. मोजमाप पुस्तिकेवर नोंद केल्याप्रमाणे ही क्षेत्र 45.750 हेक्टर क्षेत्रावर फक्त 221 झाडांचे कटाई करण्यात आले होते. सदर कटाई केलेल्या झाडांच्या थुटावर आलेल्या फुटव्यापैकी एक चांगला फुटवा ठेवून उर्वरीत फुटवे कापण्यात आले असल्याची नोंद केली आहे. परंतू मोजमाप पुस्तिकेवर नोंद असल्याप्रमाणे निष्कासीत केलेले थुटावर आलेले फुटव्यांची साफसफाई करण्यात आल्याचे दिसून आले नाही. मोजमाप पुस्तिकेवर नोंद असल्याप्रमाणे कटाई केलेल्या थुटावर एक चांगला फुटवा ठेवून उर्वरीत फुटवे कापण्यात आले, अशा प्रकारची कामे मोक्यावर स्पष्ट दिसून येत नाही. सदर कुपात कटाई केलेले 221 झाडांचे थुटाचे तुलनेत रक्कम रू. 38190/– अतिशय जास्त वाटते. तसेच क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी अशा प्रकारची कामे मोक्यावर दाखवू शकले नाहीत. अशा प्रकारचे कामांचा ग्रीडनिहाय व प्रजातीनिहाय नोंद सुध्दा मोजमाप पुस्तिकेवर करण्यात आली नाही. एकंदरीत क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी मोक्यावर सीबीओ कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केले नसल्याचे दिसून येत असून सदर कामे करण्यास दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असून वरीष्ठ पातळीवर सुध्दा त्याची तपासणी झाली नाही. सदर कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे मोक्यावर झाले नसताना सुध्दा रक्कम खर्च करण्यात आले आहे. त्याची तपासणी होवून पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कुपात मोजमाप पुस्तिकेवर नोंद केलेल्या सीबीओ कामाची संपुर्ण तपासणी मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, नागपूर यांना मोक्यावर भेट देवून त्याची तपासणी होवून पुढील आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक आहे. |
| 8 | जामकांद्री | CBO | SCI | मंडेकसा | 45 RF | II | 122.053 | 45.719 | सदर कुपात वर्ष 2010–11 मध्ये सीबीओ ची कामे प्रस्तावित करणे आवश्यक असताना कोणत्याही प्रकारचे विचलन प्रस्ताव मंजूर करून न घेता वर्ष 2011–12 मध्ये सीबीओ ची कामे |

(26)

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

करण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहेत.सदर कुपात सीबीओ चे कामाकरीता निष्कासनासाठी झाडे शिल्लक नसताना सुध्दा मोजमाप पुस्तकामध्ये सीबीओचे काम केले असल्याचे नोंद करण्यात आली आहे. मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे सीबीओ अंतर्गत मुख्य कुपात शिल्लक झाडांचे निष्कासन पुढील वर्षी करणे आवश्यक असून अशा प्रकारची कामे सदर कुपात करण्यात आली नाहीत. परंतू सदर कुपाकरीता सीबीओ काम करणे, अनावश्यक शेंडामोड व लहान झाडे तोडणे, बेला कटाई, थुटावरील 1–2 जोमदार फुटवे ठेवून इतर फुटवे छाटणी व थुटाची साफसफाई/ड्रेसिंग करणे व नैसर्गिक पुर्नउत्पत्तीचे कामे करण्याकरीता एकूण 45.719 हेक्टरकरीता रु. 42572/– चे अंदाजपत्रक मंजूर करुन सदर क्षेत्रावर दिनांक 01/01/2012 ते 18/01/2012 पर्यंत सदर कामे करण्यात आल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आले असून सदर कामावर रु.42572/– खर्च करण्यात आले आहे. सदर कुपाची मोका तपासणी केली असता, सदर कुपात ग्रीड व बेसलाईन मोक्यावर टाकण्यात आले नाही. सदर कुपात सीबीओ साठी आवश्यक असलेले झाडे नसताना सुध्दा अशा प्रकारची कामे केली असल्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद करण्यात आली आहे. मोजमाप पुस्तिकेवर नोंद केल्याप्रमाणे डी क्षेत्र 45.719 हेक्टर क्षेत्रावर फक्त 281 झाडांचे कटाई करण्यात आले होते. कटाई केलेल्या झाडांच्या थुटावर आलेल्या फुटव्यापैकी एक चांगला फुटवा ठेवून उर्वरीत फुटवे कापण्यात आले असल्याची नोंद केली आहे. परंतू मोजमाप पुस्तिकेवर नोंद असल्याप्रमाणे निष्कासीत केलेले थुटावर आलेले फुटव्यांची साफसफाई करण्यात आल्याचे दिसून आले नाही. मोजमाप पुस्तिकेवर नोंद असल्याप्रमाणे कटाई केलेल्या थुटावर एक चांगला फुटवा ठेवून उर्वरीत फुटवे कापण्यात आले, अशा प्रकारची कामे मोक्यावर स्पष्ट दिसून येत नाही. सदर कुपात कटाई केलेले 281 झाडांचे थुटाचे तुलनेत रक्कम रु. 42572/– अतिशय जास्त वाटते. तसेच क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी अशा प्रकारची कामे मोक्यावर सुध्दा दाखवू शकले नाहीत. अशा प्रकारचे कामांचा ग्रीडनिहाय व प्रजातीनिहाय नोंद सुध्दा मोजमाप पुस्तिकेवर करण्यात आली नाही. एकंदरीत क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी मोक्यावर सीबीओ कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे केले नसल्याचे दिसून येत असून सदर कामे करण्यास दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असून वरीष्ठ पातळीवर सुध्दा

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय

(२८)



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | त्याची तपासणी झाली नाही. सदर कामे मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे मोक्यावर झाले नसताना सुध्दा रक्कम खर्च करण्यात आले आहे. त्याची तपासणी होवून पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कुपात मोजमाप पुस्तिकेवर नोंद केलेल्या सीबीओ कामाची संपुर्ण तपासणी मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, नागपूर यांना मोक्यावर भेट देवून त्याची तपासणी होवून पुढील आवश्यक कार्यवाही होणे आवश्यक आहे. |

मुख्य वनसंरक्षक,
कार्य आयोजना, नागपूर

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना
नागपूर यांचे कार्यालय